दुरध्वनी- 020-26362772

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ,
पुणे-४११००१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

E-mail:trti.mah@nic.in
Website: trti.maharashtra.gov.in

जावक क्र. आसंप्रसं-२०२३/स्पर्धा परीक्षा/का- ४/ 9063

दिनांक : २८.०३.२०२३

प्रति,

**सह आयुक्त,**

अनुसूचित जमात प्रमाणपत्र तपासणी समिती,
पुणे, ठाणे, पालघर, नाशिक, नाशिक- २, नंदुरबार, धुळे, औरंगाबाद,
किनवट, नागपूर, गोंदिया, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली, गडचिरोली २.

**विषय :** **संघ/महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या भारतीय/राज्य प्रशासकीय सेवा स्पर्धा पूर्व परीक्षांच्या संपूर्ण तयारीकरिता ०९ विद्यापीठांमधून प्रशिक्षण देणे योजनेत प्रवेश घेण्यासाठी प्रतीक्षा यादीतील उमेदवारांची शैक्षणिक व इतर मूळ कागदपत्रे तपासणी करून त्याचा अहवाल पाठविणेबाबत...**

**संदर्भ :**
१. आदिवासी विकास विभाग, शा.नि.क्र. प्रशिक्षण – २०१२/प्र.क्र. १५८ (भाग-२) का.१७, दिनांक १५ जुलै, २०१४.
२. आदिवासी विकास विभाग, शा.शुद्धिपत्र क्र. प्रशिक्षण – २०१९/प्र.क्र. २१/ का.०९, दिनांक २५ मार्च, २०१९.
३. आदिवासी विकास विभाग, शा.शुद्धिपत्र क्र. प्रशिक्षण – २०१९/प्र.क्र. २१/ का.०९, दिनांक ३० ऑगस्ट, २०१९.

उपरोक्त शासन निर्णय क्र. १ ते ३ अन्वये, वर्ष २०२२-२३ या कालावधीमध्ये संघ/महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या भारतीय/राज्य प्रशासकीय सेवा स्पर्धा पूर्व परीक्षांच्या संपूर्ण तयारीकरिता ०९ विद्यापीठांमधून प्रशिक्षण देणे योजना राबविण्यात येत आहे. यानुसार आपल्या कार्यक्षेत्रातील उमेदवारांचे शैक्षणिक व इतर कागदपत्रे तपासण्यासाठी **दिनांक ०३ ते १० मार्च, २०२३** हा कालावधी निश्चित करण्यात आला होता. निवड यादीतील ज्या उमेदवारांनी सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी नकार दर्शविला आहे त्या उमेदवारांच्या जागी प्रतीक्षा यादीतील उमेदवारांची निवड करण्यासाठी त्यांना दूरध्वनी करण्यात येत आहे. त्यावेळेस उमेदवारांनी मूळ कागदपत्रे समिती कार्यालयात जाऊन तपासले आहेत की नाही याबद्दल विचारणा केल्यावर त्यांनी अद्याप त्यांचे मूळ कागदपत्रे तपासलेले नाहीत अशी माहिती मिळत आहे. मात्र प्रतीक्षा यादीतील उमेदवारांचे कागदपत्रे तपासणी झाल्याशिवाय त्यांना विद्यापीठनिहाय राबविण्यात येणाऱ्या योजनेचा लाभ देता येणार नसल्याने दिनांक २८.०३.२०२३ ते ३१.०३.२०२३ या कालावधीत आपल्या समितीमध्ये येणाऱ्या प्रतीक्षा यादीतील उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची तपासणी करावयाची आहे.

प्रतीक्षा यादीतील उमेदवारांचे कागदपत्रे तपासणी झाल्यावर उमेदवाराने जी कागदपत्रे जोडली आहेत ती तपासणी अधिकारी यांनी तपासून त्याबद्दलचा शेरा प्रवेश अर्जातील verifying remark या रकान्यात नोंदवून त्या कागदपत्रांची एक छायांकित प्रत व संबधित इतर कागदपत्रे घेऊन तसेच तपासणी केलेल्या विद्यार्थ्यांचा अहवाल तयार करून आपल्या कार्यालयाच्या प्रतिनिधी सोबत कागदपत्रांचा संच, हमीपत्र व प्रवेश अर्ज या कार्यालयास सादर करावे. आपल्या तपासणी अहवाल प्राप्तीनंतरच उमेदवारांना विद्यापीठात प्रवेश देण्यात येणार आहे.

- सोबत प्रतीक्षा यादी जोडण्यात येत आहे.

(हंसध्वज सोनवणे)
सहसंचालक